ई-साहित्य प्रकाशन

# निरामय नेटअक्षरी

०५.०१.२००९
अंक : ७

## निरामय..
## कवयित्री इंदिरा संतांच्या निर्मल काव्याला आणि प्रतिभेला भावपूर्ण आदरांजली



### संपादक मंडळ

**संपादक -**
सुरुचि नाईक ( नागपूर )

**अतिथी संपादक -**

महेंद्र कुलकर्णी (मुंबई )

**सहसंपादक -**
स्वप्ना कोल्हे ( नाशिक )
सोनाली घाटपांडे ( पुणे )
रेणूका रेपाळ ( अमेरिका )
आनंद माने ( सोलापूर )
नाम गुम जायेगा ( ठाणे )

©या अंकाचे सर्व हक्क कवींच्या स्वाधीन

बहुरंगी आठवणी मागे ठेवत २००८ सरलं , २००९ सुरु झालंय.
नवीन आशा,नवीन संकल्प,ओसंडत्या उत्साह आणि नव्या जोषात.
ह्या सळसळत्या नवीन वर्षातला नेटाक्षरीचा हा पहिला अंक.
नूतन वर्षाचा आस्वाद आपण मागच्या अंकात घेतला आहेच.
मोठ्या डेरेदार वृक्षाला रसरशीत फळे यावीत तसं नवं वर्ष समोर ताजेपणा घेऊन उभं आहे आणि मुरलेल्या लोणच्यातील कैरीची आंबट गोड चव जिभेवर रेंगाळावी तशा जुन्या आठवणी मनात घोळत आहेत.काही अविस्मरणीय क्षण,व्यक्ती,प्रसंग मात्र अगदी नव्यासारखेच ताजे हिरवे असे मनाला वेढून बसले आहेत.आणि त्यांच्या स्मृतीदेखील हिरवंगार करणाऱ्या ! आनंद देणाऱ्या.
हीच संकल्पना मनात ठेवून आम्ही तुम्हाला ह्या अंकात “जुनं ते सोनं” हा अनुभव देणार आहोत.

### ४ जानेवारी हा इंदिरा संत या ज्येष्ठ कवयित्रीचा जन्मदिवस.

त्यांच्या कवितांचा आल्हाददायक आस्वाद ह्या अंकात सादर करीत आहोत.
सादर करतोय निर्मल मनोवृत्तीच्या इंदिरा बाईंच्या निरामय कविता आणि वाहतोय त्यांना एक भावपूर्ण आदरांजली.

ह्या विनामूल्य अंक नियमित मिळण्यासाठी तसेच सूचना,अभिप्राय,प्रतिक्रियांसाठी..
netaksharee@gmail.com

# इंदिरा संत – एक प्रकाशझोत

( जीवनकाल : ४ जानेवारी १९१४ - १३ जुलै २०००)



**कवयित्री,कथाकार,ललित लेखिका.**

फर्ग्युसन मध्ये महाविद्यालयीन शिक्षण.
तेथेच प्रा.ना.मा.संत यांच्याशी परिचय होऊन पुढे विवाह झाला.
पहिला काव्यसंग्रह - सहवास (१९४०)
१९४६ मध्ये वैधव्य आले.
१९५२ मध्ये शामली हा कथा संग्रह
१९५५ मध्ये कदली हा कथा संग्रह
१९५७ मध्ये चैतु हा कथा संग्रह

१९५१ मध्ये प्रकाशित झालेल्या "शेला" ह्या कविता संग्रहापासून त्यांची स्वतःची ओळख निर्माण झाली. विशुध्द भाव कविता लिहणारी कवयित्री म्हणून त्यांची ख्याती झाली.ह्या काव्यसंग्रहातील कविता अतिशय उत्कट,भावपूर्ण,प्रतिभा संपन्न होत्या.

१९५५ मध्ये "मेंदी" आणि १९५७ मध्ये "मृगजळ" ह्या कविता संग्रहात त्यांच्या कवितांचे सामर्थ्य पूर्णत्वाला पोहचलेले दिसते. प्रिती,एकाकीपणाचे दुःख,विरह,भावनांचा कल्लोळ निसर्ग प्रतिमातून भावोत्कटतेने आणि नेमक्या शब्दांत बांधण्याची त्यांची किमया या संग्रहातून जाणवते.

१९६४ मध्ये रंगबावरी,१९७२ मध्ये बाहुल्या,१९८२ मध्ये गर्भरेशीम,१९८९ मध्ये चित्कळा,१९८९ मध्ये वंशकुसुम आणि निराकार हे त्यांचे संग्रह प्रसिध्द झाले.
गर्भरेशीमला १९८३ साली साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले.


**सन्मान –**


अध्यक्ष,कविसंमेलन,मुंबई मराठी साहित्य संमेलन (१९५२)
अध्यक्ष,महाराष्ट्र कवयित्री संमेलन कऱ्हाड (१९७५)
अध्यक्ष,कवयित्री साहित्य संमेलन,गदग(१९८४)
अध्यक्ष,बालकुमार साहित्य संमेलन,सावंतवाडी
अध्यक्ष,साहित्य संमेलन कदिली,कर्नाटक

**पुरस्कार –**

कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा पुरस्कार,१९९९
गर्भरेशीम काव्यसंग्रहास साहित्य अकादमी पुरस्कार
गर्भरेशीम काव्यसंग्रहासाठी अनंत काणेकर पुरस्कार
मेंदी,मृगजळ या संग्रहांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार

## सादर करीत आहोत इंदिरा संतांच्या निरामय कविता



## ..निवडुंगाच्या शीर्ण फुलांचे..

निवडुंगाच्या शीर्ण फुलांचे
झुबे लालसर ल्यावे कानी
जरा शिरावे पदर खोवूनी
करवंदीच्या जाळीमधूनी

शीळ खोल ये तळरानातून
भळभळ वारा चढणीवरचा
गालापाशी झिळमिळ लाडीक
स्वाद जिभेवर आंबट कच्चा

नव्हती जाणीव आणि कुणाची
नव्हते स्वप्नही कुणी असावे
डोंगर चढणीवरी एकटे
किती फिरावे,उभे रहावे

पुन्हा कधी न का मिळायचे ते
ते माझेपण,आपले आपण
झुरते तनमन त्याच्यासाठी
उरते पदरी तिच आठवण

निवडुंगाच्या शीर्ण फुलांची
टपोर हिरव्या करवंदाची





## ..गवतफुला..

रंगरंगुल्या,सानसानुल्या
गवतफुला रे गवतफुला
असा कसा रे सांग लागला
सांग तुझा रे तुझा लळा

मित्रासंगे माळावरती
पतंग उडवित फिरतांना
तुला पाहिले गवतावरती
झुलता झुलता हसताना

विसरुनी गेलो पतंग नभिचा
विसरुन गेलो मित्राला
पाहुन तुजला हरवून गेलो
अशा तुझ्या रे रंगकळा

हिरवी नाजूक रेशीम पाती
दोन बाजुला सळसळती
नीळ निळुली एक पाकळी
पराग पिवळे झगमगती

मलाही वाटे लहान होऊन
तुझ्याहुनही लहान रे
तुझ्या संगती सदा रहावे
विसरुन शाळा,घर सारे



## ..बाभळी..

लवलव हिरवीगार पालवी काट्यांची वर मोहक जाळी
घमघम करिती लोलक पिवळे फांदी तर काळोखी काळी

झिरमिर झरती शेंगा नाजूक वेलांटीची वळणे वळणे
त्या साऱ्यातूनी झिरमिर झरती रंग नभाचे लोभसवाणे

कुसरकलाकृती अशी बाभळी तिला न ठावी नागर रिती
दूर कुठेतरी बांधावरती झुकून जराशी उभी एकटी

अंगावरती खेळवी राघू लागट शेळ्या पायाजवळी
बाळ गुराखी होऊनिया मन रमते तेथे सांज सकाळी

येथे येऊन नवेच होऊन लेऊन हिरवे नाजूक लेणे
अंगावरती माखूनी अवघ्या धुंद सुवासिक पिवळे उटणे

## ..चिमुकली पाहुणी..

चिमुकल्या पाहुणीचे
घरी आज आगमन
वास्तु झालीसे तबक
आणि मीच निरंजन

चिमुकल्या पाहुणीचे
लाड व्हावे पाळण्याचे
म्हणून का हात झाले
हार जाई गुलाबाचे

चिमुकल्या पाहुणीची
बाळ झोप कौतुकाची
डोळा उतरली रात्र
मंद मंद चांदण्याची

चिमुकल्या पाहुणीचे
खेळ हासुचे रुसुचे
आली खेळावया स्वप्ने
रुप घेऊन परीचे

चिमुकल्या पाहुणीची
झाली निघायची वेळ
आयुष्याच्या पुण्याईची
अंथरली मखमल

गेली निघून हासत
घर भरले खुणांनी
सोनपाखरे टिपावी
किती वाकुनी वाकुनी





## ..गोष्टाळे..

गोष्ट सांग गोष्ट सांग
अशी तिची मागणी
सांगते सांगते
तशी माझी पुरवणी

एक होती ऊ
ती आपली बोटं ओठावर ठेऊन
खी खी खिदळली
आणखी एक

एक होता वाघ
तिने वाघासारखा चेहरा करुन
डरकाळी फोडली
आणखी एक

एक होता हत्ती
टी हूं हूं करत एकटक
ऐकत राहिली
आणखी एक

एक होता हिप्पो
ती खोटे खोटे घाबरुन
बिलगुन बसली
आणखी एक

एक होतं माकड
ती टाळ्या पिटत नाचत
हुप हुप हसली
आणखी एक

एक होता माणूस
मला तिथेच थांबवून
तिने हात नाचवले
आणि म्हणाली
सिनेमा असतो माणसाचा
अमिताभ बच्चनचा
आणि खुदकन हसली

कशाने की
माझी मती कुंठित झाली
ती ही जमा केलेल्या झू ची
देखभाल करु लागली
बघते तो
ती गाढ झोपी गेली



## ..देता घेता..

पुस्तकातली खूण कराया
दिले एकदा पीस पांढरे
पिसाहुनि सुकुमार काहिसे
देता घेता त्यात थरारे

मेजावरचे वजन छानसे
म्हणून दिला नाजूक शिंपला
देता घेता उमटे काही
मिना तयाचा त्यावर जडला

असेच काही द्यावे घ्यावे
दिला एकदा ताजा मरवा
देता घेता त्यात मिसळला
गंध मनातील त्याहून हिरवा



## ..लिहितांना..

अडखळे लिहीतांना
हात कधी अवचित
आणि निरखुन डोळे
पहातात अक्षरात

कानावेलांटीचा डौल
मोड तशी अक्षराची
कधी द्यावी,कधी नाही
रेघ अक्षरावरची

नकळत उमटली
कुणाची ही काय तऱ्हा
इवल्याशा रेषेमाजी
भावजीवनाचा झरा

नव्हतेच अक्षरे ही
स्मृतीसुमनांचे झेले
एकाएका अक्षरात
भावगंध दरवळे

म्हणूनीच लिहीतांना
अवचित थांबे हात
धुके तसे आसवांचे
उभे राही लोचनांत





## ..पत्र लिही पण..

पत्र लिही पण नको पाठवू
शाईमधूनी काजळ गहिरे
लिपीरेषांच्या जाळीमधूनी
नको पाठवू हसू लाजरे

चढण लाडकी भुवई मधली
नको पाठवू वेलांटीतून
नको पाठवू तीळ गालीचा
पूर्णविरामांच्या बिंदूतून

नको पाठवू अक्षरांतूनी
शब्दामधले अधिरे स्पंदन
कागदातूनी नको पाठवू
स्पर्शामधला कंप विलक्षण

नको पाठवू वीज सुवासिक
उलगडणारी घडीघडीतून
नको पाठवू असे कितीदा
सांगितले मी,तू हट्टी पण

पाठविसी ते सगळे सगळे
पहिल्या ओळीमध्येच मिळते
पत्रच पुढचे त्यानंतर पण
वाचायचे जाते राहून



## ..तुला विसरण्यासाठी..

तुला विसरण्यासाठी , पट सोंगट्या खेळते
आकांताने घेता दान , पटालाही घेरी येते

असे कसे एकाएकी , फासे जळले मुठीत
कशा तुझ्या आठवणी , उभ्या कट्टीत कट्टीत

दिला उधळून डाव , आणि निघाले कुठेही
जिथे तुझे असे ,तुझे असे काही नाही

दृष्टी ठेविली समोर ,चालले मी कुठेही त
कुठेही च्या टोकापाशी , उभी मात्र तुझी मूर्ती

वाट टाकली मोडून , आणि गाठला मी डोह
एक तोच कनवाळू , माझे जाणील हृदय

नाव तुझे येण्या आधी , दिला झोकून मी तोल
डोह लागला मिटाया , तुझी होऊन ओंजळ



## ..धीट सोबत कोवळी..

केशरीशी चंद्रकोर
हळु चांदण्यांचा स्पर्श
प्रीत उमटे मनाशी
पारिजाताचा पाऊस

अशी सुकुमार प्रीत
बाई जपावी जपावी
केतकीच्या पातीमध्ये
कशी शेल्याने झाकावी

केतकीची पात कशी
सदासतेज पिवळी
सदा मधुर सुवासी
धीट सोबत कोवळी

कुणी केव्हा सतावला
फणा उभारी नागीण
नाजुकशी चंद्रकोर
तिला केतकी राखीण

## ..पाऊस..

नको नको रे पावसा
असा धिंगाणा अवेळी
घर माझे चंद्रमौळी
आणि दारात सावली

नको नाचू तडा तडा
असा कौलारुवरुन
तांबे,तपेली पातेली
आणू मी भांडी कुठून ?

नको करु झोंबाझोंबी
माझी नाजुक वेळण
नको टाकू फुलमाळ
अशी मातीत लोटून

आडदांडा,नको येऊ
झेपावत दारातून
माझे नेसुचे जुनेर
नको टाकू भिजवून

किती सोसले मी तुझे
माझे एवढे ऐक ना
वाटेवर माझा सखा
त्याला माघारी आण ना


वेशीपुढे आठ कोस
जा रे आडवा धावत
विजेबाई,कडाडून
मागे फिरव पांथस्थ

आणि पावसा,राजसा
नीट आण सांभाळून
घाल कितीही धिंगाणा
मग मुळी ना बोलेन

पितळेची लोटी वाटी
तुझ्यासाठी मी मांडीन
माझ्या सख्याच्या
डोळयांत
तुझ्या विजेला पूजीन

नको नको रे पावसा..







## ..ऐक जरा ना..

ऐक जरा ना
अंधाराने कडे घातले , घराभोवती
जळधारांनी झडप घातली , कौलावर
एकाकीपण आले पसरत , दिशादिशातून

घेरायास्तव , एकटीच मी
पडते निपचित मिटून डोळे

हळुच येते दार घराचे , अंधारातून
उभे राहते बाजूला

ऐक जरा ना,
आठवते मज ती टकटक,त्या बोटांची
शहारते अन रंगरोगणाखाली,एक आठवण,गतजन्मीची
आभाळातून पडणाऱ्या त्या थेंबाची

ऐक जरा ना, दंडावरती हात ठेवूनी ,कुजबुजते आरामखुर्ची

आठवते का अजून तुला ती ,कातरवेळा
माहित नव्हते तुजला
वाट तुझी तो पाहत होता,मिटून डोळे
होते दाटून असह्य ओझे
होती धुमसत विद्युत काळी
अजुन होते मजला जाणीव,निबीड वनांतील
मध्यरात्रीच्या वावटळीची,झपाटल्याची

ऐक जरा ना,कौलारातून थेंब ठिबकला
ओठांवरती,ऐक जरा ना

ऐक जरा ना,एक आठवण
ज्येष्ठामधल्या त्या रात्रीच्या,पहिल्या प्रहरी
अनपेक्षितसे,तया कोंडले जलधारांनी,तुझ्याच पाशी

उठला जेव्हा बंद कराया,उघडी खिडकी
कसे म्हणाला,मीच ऐकले शब्द तयाचे
या डाळयांची करील चोरी,वीज चोरटी,हेच मला भय

धडपडले मी,उठले तेथून
सुटले धावत
त्या वास्तूतून,त्या पाण्यातून
दिशादिशातून
हात ठेवूनी कानावरती
ऐकू न यावे शब्द कुणाचे
ऐक जरा ना, ऐक जरा ना ,ऐक जरा ना

“वंशकुसूम” या काव्य संग्रहातील इंदिराबाईंचे मनोगत त्यांच्या निर्मल मनाचे दर्शन घडविते.आपल्यासाठी ते खास इथे देत आहोत.

## माझे मनोगत — इंदिरा संत




“वंश कुसूम” हा माझा आठवा कविता संग्रह.अगदी अनपेक्षित अशी पॉप्युलर प्रकाशनाचे श्री.रामदास भटकळ यांची मागणी आली.ते स्वतःच आले होते.म्हणाले, “आमच्या प्रकाशनात तुमची कविता हवीच.”

मी कवितांची वही पाहिली तर ७० कवितासुध्दा नव्हत्या.पण जेवढ्या असतील तेवढ्या त्यांना पुरेशा होत्या.त्यांच्या आग्रहाला मी नकार दिला नाही.ठरल्याप्रमाणे कविता वहीत नीट लिहून ठेवल्या आणि त्यांनी पाठवलेल्या मित्राबरोबर वही त्यांच्याकडे पाठवून दिली.सौ.वासंती मुझूमदार प्रेस कॉपी करणार असल्याने मी निर्धास्त झाले होते.पण वही हातातून गेली आणि मन एकदम मिटल्यासारखे झाले.त्यामुळेच की काय,माझ्या “शेला” पहिल्या काव्य संग्रहाची आठवण झाली.

१९३० पासून मी जाणिवपूर्वक कविता लिहू लागले.नंतर २-३ वर्षात माझी पहिली कविता प्र.श्री.कोल्हटकर ह्यांच्या “संजीवनी”त पोचवली.त्यानंतर मुंबईच्या “प्रतिभा”, “ज्योत्स्ना”, “समिक्षक” ह्या मासिकातून प्रसिध्द झाल्या.याला वा.रा.ढवळे कारणीभूत झाले.यातील दोन मासिकांशी वि.स.खांडेकर,वि.ह.कुलकर्णी यांचा संबंध होता. वा.रा.ढवळे यांचे आणि आमचे स्नेही होते.ढवळयांचा मला निरोप असायचा, “कविता तयार असेल तर संतांच्या बरोबर आमच्या ऑफिसात या.” त्याचे मासिकाचे कार्यालय प्रार्थना समाजाशेजारी कुठेतरी होते.आम्ही गेलो आणि कवितेचा कागद हाती दिला की फायलीत ठेवायचे आणि कुणाकडून तरी चहा मागवायचे.दोघांच्या खुप गप्पा व्हायच्या आणि मग आम्ही परतून येत असू.

नंतर आम्ही मुंबई सोडली.पुण्याला आलो आणि एका साध्या,सरळ,कष्टाळू व्यक्तीच्या मैत्रीला दुरावलो.पुण्याहून बेळगावी येऊन राहिलो आणि मुंबईची कधी कधी भेटणारी मैत्री देखील संपली.एके दिवशी मला अचानक ढवळे यांचे पत्र आले. “तुमची कवितांची वही पाठवून द्या”.कशासाठी याचा उल्लेख नव्हता.आता ती मासिके बंद पडली होती.तरी त्याविषयी चौकशी न करता मी कागदावर उतरुन कविता पाठवल्या.पोहोचल्याचे पत्र आले आणि मीही माझ्या व्यापात ती गोष्ट विसरुन गेले.यावेळी माझ्या कविता फक्त सत्यकथेमधून छापून येत होत्या.

एक दिवस कॉलेज मधून घरी आले तो ढवळयांचे पत्र आले होते.त्यात त्यांनी लिहले होते, “माझे मित्र ग.का.रायकर आपल्या जयहिंद प्रकाशनाच्या नव्या योजनेत तुमचा कविता संग्रह काढणार आहेत.नाव तेवढे कळवा.”या पुस्तकाचे तुम्हाला चारशे रु.मिळतील.लक्ष्मी आणि सरस्वती दोघीही बाहुल्या त्या जिव्हाळयाच्या पत्रात हातात हात घालून उभ्या होत्या.पण आता तो आनंद विसरुन गेले.कवितेतीलच एक नाव शेला त्यांना कळवले आणि स्वस्थ राहिले.

नंतर १-२ महिन्यांनी दहाच्या सुमारास कोण आले बघते तर दारात ढवळे उभे.मला कठीणच गेले.खुप वर्षांनी भेटत होते.पण त्यांचा मित्र नव्हता.ते खुर्चीवर बसत म्हणाले, “मुलांचं जेवण चाललंय वाटतं.मी आता थांबणार नाही.कोल्हापूरहून निघालो.इथे भाउंच्या बरोबर आलो आहे.मी तुमची प्रत द्यायला आलोय”.त्यांनी भराभर पिशवीतले पार्सल काढून सोडले.शेलाची प्रत माझ्या हातात देतांना ते म्हणाले, “ही तुमची पुस्तकं”.त्यांचे डोळे इतके भरुन आले की टप टप चार थेंब वरच्या प्रतीवर पडले. “मी निघतो आता.भाऊ वाट पाहत असतील”.म्हणत ते निघाले सुध्दा.मी तशीच उभी हातात पुस्तके.ते पायऱ्या उतरुन गेल्यावर मी वरचे पुस्तक मुलांच्या हाती न लागेल असे ठेवले.हातातली पुस्तके तिथल्याच टेबलावर ठेवली आणि मुलांचे जेवण बघू लागले.मजेत चालले होते.मीही त्यांच्यात मिसळले.ते वरचे पुस्तक मी अजून जपून ठेवले आहे.असे हे माझे पहिले प्रकाशन ! पुस्तक छान काढले आहे.त्या काळी आताइतके मुखपृष्ठाला महत्व नव्हते.तरी चित्रकार गोडसे यांचे चित्र आहे.कवितेविषयी वा.ल.कुलकर्णी यांनी लिहले आहे.आणि माझा फोटो ढवळयांनी ताईंकडून(कमला फडके) घेतलेला फोटो आहे.ह्या सर्व गोष्टी ढवळयांनी माझ्यापासून दूर ठेवल्या होत्या.त्या कारणानेच कासावीस झाले.या कविता आम्ही नुसत्या वाऱ्यावर सोडणार नाही असे त्यांनी एकदा सांगितल्याचेही आठवते.

त्यानंतर कॉंटिनेंटलच्या अनंतराव कुळकर्णींनी “मेंदी” हा संग्रह काढला.या दोन्ही पुस्तकांच्या दुसऱ्या आवृत्ती मौजने घेतल्या.आणि नंतरच्या “मृगजळ”, “रंगबावरी”, “बाहुल्या” हे कविता संग्रह श्री.पुं.भागवतांनी आवर्जून प्रसिध्द केले.


“गर्भरेशीम” हे बेळगावच्या नवसाहित्य या संस्थेने प्रसिध्द केले.कर्नाटकातील ही एकमेव प्रकाशन संस्था.तिला मी पुस्तक दिले पाहिजे या कर्तव्याच्या जाणिवेने मी त्यांना पुस्तक दिले.आणि आता चित्कळा ह्या मौजेने प्रसिध्द केलेल्या संग्रहानंतरचा हा कविता संग्रह “ वंशकुसूम”.श्री रामदास भटकळ यांना वही दिली आणि मोकळी झाले.

“चैतू” ची दुसरी आवृत्ती काढतांना श्री.पु.भागवत म्हणाले होते, “तुमच्या मुंबई साहित्य संमेलनाच्यावेळी झालेल्या भाषणाचे याला प्रास्ताविक जोडूया”.या भाषणात मग जरा कमी अधिक करुन शेलाची प्रस्तावना मी तयार केली होती.तीत कवितेविषयी वा तिच्या निर्मितीविषयी कवि जे काही सांगू शकेल ते सर्व मांडले आहे.त्या विचारात अजून फारसा फरक नाही.




पुढील पानावर..

त्या लेखात मी म्हटलेय,कवींच्या किंवा कलानिर्मितीक्षम व्यक्तीच्या मनात एरियल्स उभे केलेले असतात.ते एरियल्स मनात खोलवर जाऊन पोहचणाऱ्या अशा अनुभवातील क्षणांचे अणू पकडून ठेवतात.कवीमन निर्मितीक्षम असते आणि त्या मनाचे अंतराळही वेगळे असते.त्यात पंचेद्रियांना भ्रम देऊन आल्हाद देणे हे देवाघरचे देणे असते.वास्तव अंतराळात आपण बरेचदा भ्रम पाहतो.मृगजळ दिसते.हरिणाबरोबर आपल्यालाही भुलवते.प्रातःकाळी वा संध्यासमयी,कडक उन्हात,आकाशात गंधर्व नगरी उभी असल्याचा भास होतो.आपण इंद्रधनुष्य पाहतो.हे फक्त दृष्टिभ्रमच असतात.असेच इतर ज्ञानेंद्रियांचे सुध्दा भ्रम असतात.ते भ्रमरुपी शब्दं रुपात आणणे हे प्रतिभेचे सामर्थ्य असते.शब्दांची योजना वाणी ही शक्ती करते.म्हणूनच कवितेला शब्दात अधिक महत्व असते.त्या त्या भावनेला आणि भ्रमाला उचित असा,उत्कट शब्द,आशयघन शब्द मिळाला तर त्याचे सार्थक होते.यालाच शब्द आत्मस्पर्शी असावा असे म्हणतो. ज्ञानेंद्रियांचे संवेदन त्या संवेदनाला झालेले भ्रम यांना सामावून घेणारी निर्मितीची शक्ती.त्या शक्तीने निर्माण केलेले भावनेच्या काव्यात्म रुपाला जिवंत करतील असे शब्द ही कवितेची सुक्ष्म मागणी असते.असा एक विचार आजवर मनात घुमतो आहे.आज या विचारापर्यंत मी पोहचले आहे.हे चूक की बरोबर हे माहित नाही.




आज माझ्या कवितेतून निसर्गाचे रुपही मिसळलेले दिसते.कवितेसाठी किंवा कवितेतून निसर्ग प्रकट होत असतो.आज निसर्गातूनच ती प्रकट होते आहे असे मला वाटते.निसर्गाशी एकरुप होणे,आपल्या सुख दुःखांसकट त्याच्यात मिसळून जाणे तिला थोडेफार साधले आहे असे वाटते.
इतक्या संग्रहांनंतर मी नवीन काही मिळवले असेल तर ते इतकेच.हे फक्त अनुभवांचे प्रकटीकरण.शोध,अभ्यास,शास्त्रप्रयोग याबाबत मी अजून पूर्वीइतकीच अजाण आहे.माझ्या मती प्रमाणे जर काही मनात उजळले असेल तर ते एवढेच.कवितेची शब्दशक्ती.अर्थात भाव कवितेची.तीत शब्दं आत्मस्पर्शी हवा.

आणखी एक गोष्ट सांगण्यासारखी आहे.या कविता संग्रहाच्या नावाचा विचार करतांना त्याचा शोध घेतांना त्या नावाचीच एक कविता आकारली.इथे,शोधाचीच ओढ हाच एक काव्य निर्मितीक्षम बिंदू ठरलाय.यात योगायोग आणि मनाचा हट्ट या बाह्य अंगाचाही समावेश आहे.आणि कवितेच्या अंगाचाही.ज्यावेळी कविता संग्रह भटकळांनी स्वीकारला त्याच वेळी त्यांनी मला म्हटले, “कविता नीट लिहून पाठवा आणि नावही कळवा.”

कवितासंग्रह लिहीत असतांना एकही नाव मला संग्रहाला हवे असे सापडले नाही.याच वेळी योगायोग असा की मी पॉप्युलरकडून विशब्ध शारदाचे खंड मागवले होते.केव्हापासून वाचायचे होते पण मिळवणे जमत नव्हते.ते त्यांच्या योजनेमुळे मिळाले.मला चित्रकलेची ओढ फार.त्यामुळे तो खंड प्रथम वाचायला घेतला.सर्व पत्रात मला एका इंग्रज चित्रकाराची आणि बंगाल मधील चित्रकारांची पत्र नवे काही देणारी वाटली.ती वाचतांना टागोरांची आपल्या चित्रकार सहकाऱ्यांना,मित्रांना लिहलेली पत्रं वाचता वाचता एका पत्रात लिहले होते वेळुच्या फुलाला काय नाव आहे,शोधले पाहिजे.शोध केला पण मिळाले नाही.संस्कृत मध्ये वंश पुष्प म्हणतात.जिथे विचारावे तिथे बासाची फुले म्हणतात.मला कुतूहल आहे अशा अर्थाचा मजकूर त्या पत्रात होता.माझ्या मनात आले,आपल्या भागात लोकसाहित्यात हे नाव नक्की मिळेल.बघुया.मग मी मौजच्या श्रीनिवास कुलकर्णींना आणि पुण्याच्या स.प.च्या संस्कृत जाणकार व समिक्षक डॉ.लीला अर्जुनवाडकर यांना पत्रं लिहली.आणि इथे भेटेल त्याला विचारत राहिले.लिलाबाईंना मात्र लिहले, नाव चांगले असेल तर संग्रहास देता येईल.एकदा कुमार गंधर्वांनी सांगितले होते,या वेळुचे तांदूळ दाणे म्हणजे पाखरांचे,गरिबांचे अन्न.मला स्वतःला त्याची खीर फार आवडते.चविष्ट असते.

मी वेळुची बनं पाहिली आहेत.आमच्या बागेतच एक वेळुचे मोठे बेट सारखे झुलत असते.६० वर्षांनी एखादा बांबू फुलतो.मग सुकत जातो.वाळतो.उन्हात तापत आणि वाऱ्याने तापलेल्या या वेळुंचे एकमेकांशी घर्षण झाले की ते पोकळ असल्याने फुटतात.त्याचा ताडताड आवाज होतो.आणि एखाद्या वेळी त्याची ठिणगी पाचोळयावर पडून तो पेटतो.असा हा वेळू आत्मनाश करुन घेतो.इतकेच माझ्या गाठीशी होते.पण वेळुच्या फुलाचे नाव माहित नव्हते.ते फक्त माहीत व्हावे हाच ध्यास होता.
श्रीनिवासना ते नाव विचारुनही मिळाले नाही.लीलाबाईंनी मात्र बरेच पर्याय दिले.त्यांनीही किती शोध केला.अगदी जपानी भाषातज्ञाकडेदेखील मिळाले नव्हते.मग त्यांनी लिहले, “नवे नाव आपण बनवायला काय हरकत आहे.”वंशला पर्याय म्हणून त्यांनी वेतस हे नाव देखील सुचवले होते.मग मी ठरवले,बासाच्या फुलासाठी आपण नवे नाव बनवून आपल्या संग्रहाला द्यायचे.या ध्यासात माझे मन वेळू बनात इतके घुमत राहीले की त्यातून एक कविता तयार झाली. वेळू विषयी विचार करतांना वेळूच्या जीवनात आणि मानवी जीवनात मला बरेच अनुबंध मिळाले.आपले मन हे वेळूच्या बेटासारखे असते.गुंतागुंतीचे आणि नवे कोंब उमलवणारे.अंगात जितका ताठा तेवढा पालवित कोवळेपणा.तुरे येतात,फळ येत नाही.बी चे झाड होत नाही.असे सारे मनात घोळायला लागले.त्याचे तुरे हे मला कलाप्रकटीकरणच वाटले.आल्हाद देणारे.सुंदर हेतूचे.गरिबांना, श्रीमंतांना,पाखरांना आनंद देणारे.खोड तर मानवी जातीचा आसरा.वाऱ्यातून शीळ काढणारी त्याची बासरी मंजुळ स्वराची.आपल्या कान्हाची मुरली.या सर्वांनी मन भरुन आले आणि एक कविता उमलली.नाव वेळूचे बन ठेवले.पण बन फार राठ,गुंताळयाचे असते.वेळूची मंजिरी सारखी फुले असतात.मंजिरी ही एक बारीक बी फुलांची लवलवती फुलछडीच असते.आणि मग वेळूचे बन हे नाव बदलून वंशकुसूम हे नाव कवितेला दिले.मग कवितेकडे पुन्हा पाहिले तर लक्षात आले की,ही कविता लिहतांनाही नेहमीप्रमाणे न लिहता,दोन शब्दांच्या ओळी लिहल्या होत्या.कविता वेळु सारखी उभी होती.कवितेचा अंगनाही लिहतांना तीट उतरली हो ! पेरा पेरांची किंचीत झुलणारी ! फार गोड वाटली.आणि संग्रहाला तेच नाव दिले.असे हे माझ्या कविता निर्मितीचे आणि कवितेबद्दलच्या विचारांचे माझे मनोगत.

— इंदिरा संत
(माझे मनोगत - वंशकुसूम)

## अतिथी संपादक : महेंद्र कुलकर्णी -



स्वतःबद्दल काहीतरी लिही,असं संपादक सुरुचि म्हणाली आणि स्वतःबद्दल काय लिहावं हा विचार करु लागलो.खरंतर मी स्वतः लेखक नाही किंवा कवी सुध्दा नाही.जरी कविता करता येत नसली तरी चांगली कविता कळते आणि वाचायला पण आवडते.(प्रत्येकानेच कविता केल्या तर वाचेल कोण ? म्हणून माझ्यासारखे लोक आवश्यक आहेत.)इंदिरा संत,मंगेश पाडगावकर,सुरेश भट,बहिणाबाई आणि विंदा हे माझे खास आवडते कवी.
कामानिमित्त बराच प्रवास करावा लागतो.तेव्हा माझ्या लॅपटॉपच्या बॅगेत नेहमी कुठलीतरी २ कवितांची मराठी पुस्तकं असतात.विरंगुळा म्हणून कविता वाचायला,अनुभवायला आवडतात.

स्वतःबद्दल जास्त काय लिहू ? मी एक सर्वसाधारण मराठी माणूस.मराठी माणसाचे सगळे गुण अवगुण माझ्यामध्ये पुरेपुर उतरले आहेत.पुणेरी नसून पुणेरी आपल्या मराठीपणावर आणि मराठी साहित्यावर मनापासून प्रेम करणारा.

मरीन इंजिन्स रिपेअर्स,लॅंड बेस इंजिन,जनरेटर्स आणि पश्चिम भारतासाठी ( महाराष्ट्र,मध्य प्रदेश,गोवा,छत्तीसगढ,गुजरात ) इतर प्रॉडक्टस सांभाळतो.

इंदिरा संत आणि मंगेश पाडगावकर ह्यांच्या साहित्याला अर्पण केलेल्या तसेच ऑटोमोबाइल्स इंजी आणि इंजिन रिसर्च ह्या इंजिनिअरिंगच्या दोन ऑर्कुट कम्युनिटीज पण मॉडरेट करतो.

इंदिरा संत ह्यांच्या कवितांचा वाचकवर्ग जरा माझ्यासारखा म्हणजे मनातला एक नाजूक कोपरा कायम सांभाळून ठेवणारा.त्यांच्या कवितांना त्या कोपऱ्यात एक वेगळं स्थान आहे.जनरली पुरुषांचा कल हा मनाचा हळवा भाग लपवून ठेवण्याकडे असतो.त्यामुळे कदाचित असेल की त्यांच्या कवितांच्या ऑर्कुट कम्युनिटीमध्ये केवळ २४ सभासद आहेत.

त्यांच्या कविता समजून घेतांना केवळ एकच गोष्ट लक्षात घ्यायची,ती म्हणजे त्यांना अकाली आलेले वैधव्य.आणि मग प्रत्येक कवितेतला एक वेगळाच भाव प्रत्ययास येतो.मनःस्पर्शी कविता जर अनुभवयाच्या असतील तर इंदिरा संतांच्या कविता वाचायलाच हव्यात.

- महेंद्र कुलकर्णी,मुंबई
( अतिथी संपादक )

## मला उमगलेल्या इंदिरा संत -


इंदिरा संतांच्या कवितेशी माझी पहिली ओळख झाली ती वयाच्या १० व्या ११ व्या वर्षी,बालभारतीच्या पुस्तकामधून..निवडुंगाच्या शीर्ण फुलांचे ह्या कवितेतून.अजाण अबोध वयातली आणि अल्लड मनाला वेढून राहणारी ही कविता माझी आजही तोंडपाठ आहे.त्या लहान वयात तो आंबट कच्चा स्वाद ह्या कवितेसारखाच जिभेवर तरळू लागला.मात्र,पुढे जेव्हा त्यांच्या कवितेशी जवळून आणि वारंवार भेटी होऊ लागल्या तेव्हा त्यांच्यावरील कटू घाव,त्याच्या आठवणी,त्यांची आत्ममग्नता,त्यांचा स्वतःचा स्वतःशी असलेला संवाद ह्या साऱ्याची ओळख होऊ लागली.

त्यांच्या कवितेत विलक्षण ओढ दिसून येत असली तरी त्यांच्या जीवनातील घटनांचे ओरखडे त्यांच्या कवितेवर दिसत नाही.त्या आयुष्यातील घटनांचा शोध त्यांच्या कवितेतून घेतात. “शेला”ह्या त्यांच्या कवितेतून हे जाणवते.त्यांच्या काव्यात दिसणारी सुखाची अनुभूती जितकी उत्कट असते तितकीच तीव्र असते दुःखाची आर्तता.

रक्तामधील काळी बिजली
डोहामध्ये जाते मिसळून
असते जे जे तुझ्याच साठी
तू गेल्यावर जाते उधळून
तू गेल्यावर नसते मी ही
नसते माझे माझे काही
उरलेली मी अशी कोणही
माहित मजला नाही नाही

ह्या ओळी मनात एक पोकळी निर्माण करुन जातात.

पुढील पानावर..






मनात उठलेले आठवणींचे कल्लोळ शमविता शमविता त्या स्वतःला समजविण्याचाही प्रयत्न करतात.

मी सावरिले मन,आवरला अंचल
अन पुढे निघाया उचले हे पाऊल
अडखळे उंबरा होऊन काया लुळी
कोसळे खालती काही न कळे मुळी

अशी त्यांची अवस्था होते.

उभं आयुष्य संसाररथाच्या २ चाकांपैकी एकाच चाकानं काढावं आणि सोबतीला फक्त आठवणीच.मग त्या फिरुन फिरुन येणारचं.त्यांची जीवनकहाणी पुढील ओळीतून स्पष्ट होते.

तुजवीण आता तुझ्या या संसारी
अंगाराच्या सरी वर्षतात
आत बाहेरुन लागलिसे आग
तुझा घेत माग येऊ कुठे ?

त्यांच्या कवितांतून त्यांची सुक्ष्म,सखोल जीवन जाणीव आणि प्रामाणिक सात्विक प्रतिमा जाणवते.

गजातून मी पाहत बसते
आकाशाचे सुनील मार्दव
नारिंगी कौलारे रेखीव
कुंपण वेली हिच्या कातीव
रंगविलासी हृदय लोभसे
पाताळातून सरसर आली
लोखंडाची मुसळे भीषण
आकाशाला भिडली जाऊन
पुरे टाकिले मजला घेरुन
किंकाळी हृदयाची थिजली

जीवनाशी चाललेला झगडा,त्यांचे द्वंद्व,त्यांच्या अनुभूती,त्यांच्या प्रतिमा आणि यातून जन्मलेली त्यांची कविता,सुन्न करते.

अशी आरास फुलांची
मध्ये धुंद तू नागिण
एका विषाला उतार
दुजे जहर पिऊन

कधी काळ्या ढगाप्रमाणे कृष्णवर्ण ल्यालेल्या तर कधी त्याच ढगाला लाभलेली असते सोनेरी पालवी..

- सुरुचि नाईक,नागपूर
( संपादक )

“ नेटाक्षरी ” हा विनामूल्य अंक नियमित मिळण्यासाठी तसेच सूचना,अभिप्राय,प्रतिक्रियांसाठी..
netaksharee@gmail.com